**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - सावेआ - २०२१/(३८८७/२१)/वेतनपथक पुणे दिनांक - २३ जून, २०२१

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्यत्तर सस्था, पुणे

**विषय - ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनाच्या फरकाची रक्कम अदा करणेबाबत - शिक्षक कर्मचारी.**

**संदर्भ -** या कार्यालयाचे समक्रमांक दिनांक ३१ मे, २०२१ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. सदरहू पत्रान्वये या कार्यालयाने शिक्षक कर्मचा-यांना दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीमध्ये देय ठरणा-या सातव्या वेतन आयोगाच्या थकित रक्कमेची माहिती इमेलद्वारे सादर करण्याबाबत कळविलेले होते. परंतू अजूनही ब-याच महाविद्यालयांनी/अकृषी व अभिमत विद्यापीठे यांनी त्यांची माहिती सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीसह सादर केलेली नाही. ब-याच महाविद्यालयांनी/अकृषी व अभिमत विद्यापीठांनी वारंवार सुधारित इमेल पाठविल्या आहेत. तसेच महाविद्यालयांनी/अकृषी व अभिमत विद्यापीठांनी पाठविलेल्या इमेल ओपन होत नाहीत. इ. या व इतर काही कारणामुळे प्रस्तूत प्रकरणाची माहिती विहीत मुदतीत सादर करणे शक्य झालेले नाही.

वरील बाब लक्षात घेता आणि प्रस्तूतचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी या कार्यालयाने दिनांक २४ जून, २०२१ आणि २५ जून, २०२१ या दिवशी नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथील आर्टस बिल्डींगमधील खोली क्रमांक ४ येथे कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | २४ जून, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | २४ जून, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | अहमदनगर | २५ जून, २०२१ | सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| ४ | नाशिक | २५ जून, २०२१ | दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत |

तरी वर नमूद केलेल्या दिवशी व वेळेत खालील कागदपत्रे सादर करावीत.

अ. महाविद्यालय/अकृषी/अभिमत विद्यापीठाचे पत्र. **(Covering Letter)**

ब. प्राचार्य आणि अकृषी विद्यापीठांचे बाबतीत कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी यांचे प्रमाणपत्र

क. स्टेटमेंट १ (सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीसह), १ - ए, १ - बी, १ - सी, १ - डी आणि स्टेटमेंट ए

ड. प्रकरणाधीन कर्मचा-यांच्या सातव्या वेतन आयोगानुसार केलेल्या वेतननिश्चीतीच्या प्रती ( पी डी एफ मध्ये)

इ. कर्मचारीनिहाय दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीचे फरकाचे तक्ते.

**वरील अ, ब, क, ड, ई पैकी अ, ब आणि क ची माहिती हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी मध्ये (पी डी एफ मध्ये) (पेन ड्राईव्ह मध्ये) आणि ड आणि ई ची माहिती फक्त सॉफ्ट कॉपीमध्ये (पेन ड्राईव्ह मध्ये) सादर करावी. कोणत्याही परिस्थितीत वेतननिश्चिती आणि फरकाचे तक्ते यांच्या हार्डकॉपी सादर करु नयेत.**

तरी वर नमूद कलेल्या सर्व सूचना विचारात घेऊन आणि कोवीड १९ बाबतच्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करुन आपणास नेमून दिलेल्या दिवशी व वेळेत नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथे उपस्थीत रहावे.

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे